९. **सभासदत्व :**

बँकेमध्ये पुढील प्रकारचे सभासद असतील.

१) सामान्य सभासद

२) क्रियाशील सभासद

३) नाममात्र सभासद

१०) **सामान्य सभासद :**

१. बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहणारी अथवा व्यवसाय करणारी व ज्या व्यक्तीला बँकेच्या सेवांची गरज आहे व ती गरज बँक पुरवू शकत असेल व त्या व्यक्तीचा व्यवसाय बँकेच्या व्यवसायाशी समांतर अथवा संघर्ष निर्माण करणारा नसेल तर अशा व्यक्तीस सामान्य सभासद म्हणून स्विकारले जाईल.

२. बँकेचे सामान्य सभासद म्हणून खालील दिलेल्या यादीव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस सभासद म्हणून स्विकारले जाणार नाही.

अ) सज्ञान असलेली व इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १८७२ च्या कलम ११ नुसार करार करण्यास पात्र असलेली व्यक्ती.

ब) स्वत:च्या मालकीच्या संस्था असलेली व्यक्ती.

क) भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार नोंदणी झालेली भागीदारी संस्था

ड) अविभक्त हिंदु कुटुंब

इ) कंपनी कायद्यानुसार नोंदविलेली कंपनी अथवा अन्य प्रचलित कायद्यानुसार नोंदविलेल्या विश्वस्त संस्था

ई) स्थानिक स्वराज्य संस्था

ग) विश्वस्थ संस्थांसाठी प्रचलित असलेल्या कायद्यानुसार नोंदविलेली विश्वस्थ संस्था

घ) मा.निबंधक यांनी संस्थेची वैशिष्ट्ये व कार्ये यांचा विचार करुन परवानगी दिलेला कोणताही व्यक्तींचा वर्ग

च) राज्य/केंद्र सरकार

३. बँकेचा कोणताही कर्मचारी सामान्य सभासदत्वास पात्र असणार नाही. सध्या जे कर्मचारी सभासद आहेत त्यांचे सभासदत्व त्वरीत संपुष्टात येईल.

४. अन्य कोणतीही सहकारी संस्था बँकेची सामान्य सभासद होण्यास पात्र असणार नाही.

११) **सामान्य सभासदत्वासाठी अटी :**

१) खालील अटी पूर्ण करणाऱ्या अर्जदारास सामान्य सभासद म्हणून स्विकारण्यात येईल. जर त्याने -

अ) विहित नमुन्यामध्ये लिखीत स्वरुपात अर्ज केला असेल.